**दिनांक -०८/०७/२०२०** **भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-१**

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | बडनेरा |
| अपराध क्रमांक व कलम | ४६१/२०२० कलम ४५४, ५४७, ३८० भा.द.वि. प्रमाणे |
| फिर्यादी नाव व पत्ता | विलास वासुदेवराव बाबरे वय ५२ वर्ष धंदा—मुख्याध्यापक जिल्हा परीषद शाळा भानखेडा रा. अकोली रोड साई नगर रोड अमरावती |
| घटनास्थळ | जिल्हा परीषद शाळा भानखेडा |
| घटना ता. वेळ | ०४/०७/२०२० चे १२:३० वाजता ते दि. ०६/०७/२०२० चे ११:०० वा दरम्यान |
| दाखल ता. वेळ | ०७/०७/२०२० चे १९:४० वाजता |
| आरोपी नाव व पत्ता | अज्ञात |
| गुन्हयांची थोडक्यात हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी जि.प. शाळा भानखेडा बु येथे मुख्याध्यापक असुन यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्याचे शाळेतील कर्मचारीसह शाळेला कुलुप लावुन घरी गेले असता व दि. ०६/०७/२०२० रोजी ते परत शाळेत गेले असता त्यांना एका खोलीचे दाराचे कुलुप तुटलेले दिसले .खोलीमध्ये पाहणी केले असता शासना तर्फे शाळेत मिळालेले विध्यार्थी शिक्षणासाठी मिळालेले १. एक इंटेक्स कंपनीचा एल ई डी टि.व्ही मॉडेल २३०१ एस. एम. टी. साईज ३६ इंच कि. १९९५०/— रू २. दोन लहान स्पीकर कि अं ९००/— रू ३. यु.पी.एस. कि. ११००/— रू ४. एक शैक्षणिक पेनड्राईव्ह कि. ७००/— रू असा एकुण २२६५०/— चा माल कोणी तरी अज्ञात चोरटयाने नेल्याचे दिसले अशा जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपास अधिकारी नाव | पोउपनि प्रविण कुमार पाटील पो.स्टे.बडनेरा अमरावती शहर. |

**भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-२**

| | |
|---|---|
| **पोलीस स्टेशन** | **पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर** |
| **अप क्र. व कलम** | **अप क्र. ६२२/२०२० कलम ४५४,४५७,३८० भा.द.वि.** |
| **फिर्यादि नाव व पत्ता** | **ऋषी सुरेश खत्री वय ४२ वर्ष, धंदा नगरसेवक , रा. दस्तुर नगर गल्ली नं. २ अमरावती** |
| **घटनास्थळ** | **जयंत कॉलनी छत्री तलाव रोड अमरावती.** |
| **घटना ता. वेळ** | **दि०३.०७.२०२० चे १५.००वा. ते दि. ०७/०७/२०२० चे १७.३० वा. दरम्यान** |
| **दाखल ता. वेळ** | **दि. ०७.०७.२०२० चे २१.०५ वा.** |
| **आरोपी** | **अज्ञात** |
| **हकीकत** | **हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फिर्यादीची मामी ही घराला कुलुप लावुन बाहेरगावी गेली असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने तिचे घरातील समोरील दाराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन लोखंडी आलमारीतील ठेवलेले १) लोखंडी आलमारीचे लॉकर मध्ये ठेवलेले १५०००/ रु. नगदी, २) लक्ष्मी पुजनाचे सोन्याचे दोन सिक्के प्रत्येकी १ ग्रॅम वजनाचे कि. अं. ५०००/ रु. ३) प्रत्येकी ५ ग्रॅम वजनाचे चांदीचे १५ सिक्के एकुण ७५ ग्रॅम वजनाचे कि. ५०००/ रु. असा एकुण २५,०००/ रु. चा माल चोरुन नेला अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. सर्व ठाणेदार यांना वायरलेस मॅसेज करुन माहीती देण्यात आली.** |
| **तपासी अधिकारी नाव** | **स.पो.उप. नि अनंत चिमोटे ब.न. ३३० पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर** |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-३

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र. ६२३/२०२० कलम ४५२,२९४,५०६,३२३,३४ भा.द.वि. |
| फिर्यादि नाव व पत्ता | आकाशचंद्र बबनराव गोहत्रे वय २७ वर्ष, धंदा - शिक्षण रा. शांती नगर अमरावती |
| घटनास्थळ | शांती नगर अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. ०६/०७/२०२० चे २२.०० वा. दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि. ०७.०७.२०२० चे २१.३२ वा. |
| आरोपी | १.विक्की बाबर रा. कमल कॉलनी , २) एक महीला रा शांती नगर अमरावती |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील आरोपी क्र. २ ही फिर्यादीचे घरी भाड्याने राहत असुन घराच्या वरच्या माळ्यावर राहते . आरोपी क्र. १ हे आरोपी क्र. २ चा प्रियकर असुन रात्री बे रात्री आरोपी क्र. २ च्या घरी येतो व दोघे भांडण करतात त्यामुळे फिर्यादीस व इतर भाडाकरुंना आरोपी पासुन त्रास आहे. त्यामुळे फिर्यादी हे त्यांना समजाविण्यासाठी गेले असता आरोपीनी फिर्यादी सोबत वाद घालुन फसविण्याची धमकी दिल्याने याआधी आरोपी विरुद्ध फिर्यादीने तक्रार दिली आहे. नमुद घ. ता. वेळी व ठीकानी फिर्यादी बाहेरुन घरी आला असता अचानक काही वेळा नंतर दोन्ही आरोपी फिर्यादीच्या घरात घुसले आरोपी क्र. १ याने फिर्यादीची कॉलर पकडुन भुक्की मारली व अश्लिल भाषेत शिवीगाळ करुन चाकुने मारण्याची धमकी दिली . तेव्ही आरोपी क्र. १ निघुन गेल्यावर आरोपी क्र. २ हीने फिर्यादीस अश्लिल भाषेत शिवीगाळ केली, व तुला लेडीज पावर दाखविते व ३५४ च्या मोठ्या गुन्ह्यात फसविते असे म्हणुन फिर्यादीला कॉलर पकडुन चापटांनी मारहान केली. हा आरोपीचा नेहमीचा त्रास आहे. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी नाव | स.पो.उप. नि अनंत चिमोटे ब.न. ३३० पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |

## भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-४

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | राजापेठ |
| अप क्र. व कलम | ४४८/२०२० कलम ३७९ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | मनोहर वसंतराव ठाकरे वय ५० वर्ष रा.संस्कार आनंद रेसीडेन्सी नंदनवन कॉलनी अमरावती |
| घटनास्थळ | संस्कार आनंद रेसीडेन्सी नंदनवन कॉलनी अमरावती |
| घटना ता. वेळ | दि.३०/०६/२०२० चे सकाळी ०७/०० वा. ते दि.०१/०७/२०२० चे १०/३० वा. दरम्यान |
| दाखल ता. वेळ. | दि.०७/०७/२०२० चे १९/०४ वा. |
| आरोपी | अज्ञात |
| गन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील नमुद घ. ता.वेळी फीर्यादी यांनी त्यांची मोटर सायकल स्पेंडर प्लस मोटर सायकल क्र.एम.एच.२७- टी-३९८६ कि.अं.२०,०००/-रु.ही त्याचे घरासमोर कम्पाउंड मध्ये उभी करुन ठेवली असता ती कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली. अशा फीर्यादीचे तक्रीवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अंमलदार | सपोउपनि मनोज उसरडे ब.नं. ५६५ पो स्टे. राजापेठ अमरावती |

**भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-५**

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | सिटी कोतवाली |
| अप क्र. व कलम | अप क्र. 196/2020 कलम 380,461 भादंवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | विजय अंनतराव टाले वय 45 वर्ष रा.मेडीकल रिटेल होलसेल अंनत एजन्सी सरोज चौक,अमरावती |
| घटनास्थळ | अंनत मेडीकल एजन्सी चे गोडाउन, सरोज चौक,अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. 06/07/2020 चे 20.00 वा. ते . 07/07/2020 चे 08.30 वा. दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि. 07/07/2020 चे 16.07 वा. |
| आरोपी | अज्ञात |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी यांनी त्यांचे गोडाउन रात्री कुलुप लाउन बंद केले व दिसऱ्या दिवशी सकाळी 08.00 वा दुकान उघडण्यास आले असता गल्यावरील माल व मागील गोदाउन चे लाकडी दार तसेच लोखंडी चॉनेलचे गेट रुख्मीणी वल्लभ दुकानाचे क़डी,कोंडा कुलुप तोडुन आत प्रवेश करुन1) निगदी 22,000/-रु.,2)इन्टाजेसीक ऑईनमेंट,ओमनीजेल,पेनकेअर ऑईल,पेस्ट मेडीसिन कि.अं.16,000/- रु.,3)DVR साहित्य 12,357/-रु.,4)I Ball 2कंपनीचा DVR कि.अं.12,332/-रु.असा एकुण 62,689/-रु.चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली. अृशा फिर्यादीचे जबाणी रीपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला |
| तपासी अधिकारी नाव | PSI घावडे पो. स्टे. सिटी कोतवाली अमरावती. |

**भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत-६**

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | खोलापुरी गेट, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | २०१/२०२० कलम ४५२, ३२४, ५०४, ३४ भा.द.वी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महीला |
| आरोपी | १) सागर वानखडे , २) योगेश वानखडे , ३) गजान वानखडे, ४) एक महीला सर्व रा अमरावती |
| घटनास्थळ | आनंद नगर अमरावती |
| घटना ता. वेळ | ०६.०७.२०२० चे २१.०० वा |
| दाखल ता. वेळ | ०७.०७.२०२० चे ००.२९ वा |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादीची मुलगी हिला तिचा नवरा आरोपी क्र २ याचे कडुन त्रास असल्याने ती तिच्या दोन मुलासह फिर्यादी कडे राहते या कारणा वरुन यातील नमुद आरोपी हे फिर्यादी व फिर्यादीचे पती सोबत नेहमी भांडण करतात नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी हे फिर्यादी चे घरात आले व फिर्यादी सोबत भांडण करु लागले आरोपी क्र १ याने हातात काठी आनली होती ती फिर्यादीचे डोक्यावर व हातापायावर मारली त्यामुळे फिर्यादीचे डोके फुटुन रक्त निघाले व आरोपी क्र २ व ३ यांनी फिर्यादीस थापडा भुक्यांनी मारहान केली व आरोपी क्र ४ हिने फिर्यादीचे केस धरुन ओढले व नमुद आरोपीतानी फिर्यादी व फिर्यादीचे पतीला शिवीगाळ करुन निघुन गेले. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट व मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी नाव | स पो नि सोनुताई झानरे पो. स्टे खोलापुरी गेट अमरावती |

भाग -६ गुन्हे बाबत-१

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र ५४७/२०२० कलम ५०५ (२) भादवि |
| फिर्यादी नाव व पत्ता | सरतर्फे वपोनि मनिष ठाकरे पोस्टे गाडगे नगर अमरावती शहर |
| घटनास्थळ | फायर ब्रिगेड ऑफिस वलगाव रोड समोर अमरावती |
| घटना ता. वेळ | ०७.०७.२०२० चे ०८.५१ वा |
| दाखल ता. वेळ | ०७.०७.२०२० चे १६.०२ वा |
| आरोपी | अन्नु अन्वर अब्दुल समद रंगारी वय ३५ वर्ष रा जुना सराफा सामरा भवन समोर अमरावती |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी पोस्टे गाडगे नगर ला दि ०७.०७.२०२० चे रात्री ०३.०० वा दरम्यान पोस्टेला येवुन माहिती दिली की त्याच्या घरी ०८ ते १० लोक येवुन शिवीगाळ करून म्हटले की तुने संजय शर्मा पर हमला कैसे किया तु बाहर निकल तेरे को गोल्या मारते इस शहर का बाप मुसलमान हमारे पास है असे बोलुन धमकी दिली. वरून NDO वाकोडे यांनी घटनास्थळी जावुन दोन इसमांना विचारपुस करून सविस्तर बयाण नोंदवुन असे कोणतेही प्रकार घटनास्थळी चौकशी अंती निष्पन्न झाले नाही यातील आरोपी हे वर्गा-वर्गामध्ये शत्रुत्व, व्देषभावना, तसेच जातीय तेढ निर्माण होईल असे विधान करित असल्यामुळे त्याच्या या कृत्यामुळे दोन समाजामध्ये शत्रुत्वाची भावना निर्माण होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. वरून आरोपी विरूध्द कलम ५०५ (२) भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| तपासी अधि. नाव | पोउपनि. होळगे पो. स्टे. गाडगे नगर, अमरावती शहर |

प्रोव्हीशन रेड-१

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | ६२०/२०२०कलम ६५(फ) म.दा.का. |
| फिर्यादि नाव व पत्ता | सरतर्फे स.पो.उप.नि प्रकाश राठोड ब.न.५०० पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |
| घटनास्थळ | परिहारपुरा वडाळी अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. ०७.०७.२०२० चे १२.३० वा दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि.०७.०७.२०२० चे १७.४५ वा. |
| आरोपी | एक महीला |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी पोस्टे स्टाफ सह पोस्टेहद्दीत पेट्रोलींग करीत असता मिळालेल्या गुप्त बातमीदाराचे माहीतीवरुन नमुद घटना ता वेळी व ठीकाणी नमुद आरोपी हीचे वर प्रोव्ही रेड केली असता नमुद आरोपी हीचे ताब्यातुन १५ लिटर गा.ह.भ.ची दारु कि. अं. १५००/ रु. चा प्रोव्ही माल पंचासमक्ष जप्ती पत्रका प्रमाणे जप्त करुन ताब्यात घेतला अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी नाव | स.पो.उप. नि अनंत चिमोटे ब.न. ३३० पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |

प्रोव्हीशन रेड-२

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | ६२१/२०२०कलम ६५(फ) म.दा.का. |
| फिर्यादि नाव व पत्ता | सरतर्फे स.पो.उप.नि प्रकाश राठोड ब.न.५०० पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |
| घटनास्थळ | परिहारपुरा वडाळी अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. ०७.०७.२०२० चे १२.४५ वा दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि.०७.०७.२०२० चे १८.०४ वा. |
| आरोपी | गेंदालाल तुकाराम बेनिवाल वय ५० वर्ष, रा. परीहारपुरा वडाळी अमरावती |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी पोस्टे स्टाफ सह पोस्टेहद्दीत पेट्रोलींग करीत असता मिळालेल्या गुप्त बातमीदाराचे माहीतीवरुन नमुद घटना ता वेळी व ठीकाणी नमुद आरोपी हीचे वर प्रोव्ही रेड केली असता नमुद आरोपी हीचे ताब्यातुन १० लिटर गा.ह.भ.ची दारु कि. अं. १०००/ रु. चा प्रोव्ही माल पंचासमक्ष जप्ती पत्रका प्रमाणे जप्त करुन ताब्यात घेतला अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी नाव | स.पो.उप. नि अनंत चिमोटे ब.न. ३३० पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर |

**प्रोव्हीशन रेड-३**

| | |
|---|---|
| पोलीसस्टेशन | भातकुली |
| अप क्र. व कलम | 110/2020 कलम 65 (ई) म.दा.का. |
| फिर्यादि नाव व पत्ता | सर तर्फे पो.हे.काँ.गजानन खुरक्टे ब.न.762, पो.स्टे.भातकुली, अमरावती शहर. |
| घटनास्थळ | शाळेजवळ हरताळा,भातकुली. |
| घ.ता. वेळ | दि.07-07-2020 रोजीचे 12/05 वाजता ते 12/35 वाजता दरम्यान. |
| दाखल ता. वेळ | दि.07-07-2020 रोजीचे 13/35 वाजता. |
| आरोपी | पांडुरंग दशरथ वानखडे वय 62 वर्ष,रा. हरताळा,भातकुली. |
| गुन्ह्याची थोडक्यातहकिकत | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद.घ.ता. वेळी व ठिकाणी गुप्त बातमीदाराचे खात्रीलायक खबरेवरुन यातील नमुद आरोपीवर पंचासमक्ष प्रोव्हीरेड केला असता यातील नमुद आरोपी यातील नमुद आरोपीचे ताब्यात कापडी 06 नग देशी दारुच्या पावट्या 180 एम.एलच्या कि.420/- रुचा प्रोव्ही माल मिळुन आला वरुन आरोपीचे हे कृत्य कलम 65 (ई) म.दा.का अन्वये होत असल्याने गुन्हा सदरचा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी नाव | सर तर्फेपो.हे.काँ.गजानन खुरक्टे ब.न.762, पो.स्टे.भातकुली, अमरावती शहर. |

**अकस्मात मृत्यु-१**

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर ,अमरावती शहर |
| मर्ग क्र. व कलम | मर्ग क्र ००/२०२० कलम १७४ जाफौ |
| फिर्यादी | वार्डबॉय विजय देवीदास बोबडे वय ५० रा PDMC हॉस्पीटल अमरावती |
| मृतकाचे नाव व पत्ता | सुचीता रामेश्वर इंगळे वय ३२ रा काटपुर ता मोर्शी जि अमरावती |
| घटनास्थळ | काटपुर ता मोर्शी जि अमरावती |
| घटना ता. वेळ | ०७.०७.२०२० चे १७.२८ वा |
| दाखल ता. वेळ | ०७.०७.२०२० चे १८.४१ वा |
| मरणाचे कारण | मृत अवस्थेत आणले आहे. |
| गुन्ह्याची थोडक्यात हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की आज रोजी नापोकॉ पांडे बनं ११९२ यांची स्टेडा डयुटी असतांना PDMC हॉस्पीटल अमरावती येथील वार्डबॉय नामे विजय देवीदास बोबडे वय ५० वर्ष PDMC हॉस्पीटल अमरावती याने खालील प्रमाणे मेमो क्र ४० आणुन दाखल केला आहे सुचिता रामेश्वर इंगळे वय ३२ वर्ष रा काटपुर ता मोर्शी जि अमरावती मृत अवस्थेत आणलेले आहे दि ०७०७.२०२० अशा मरणाचा मेमो आणुन दाखल केला आहे अशा मेमो वरून सदरचा मर्ग दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी नाव | पोउपनि. होळगे पो. स्टे. गाडगे नगर, अमरावती शहर |

**अकस्मात मृत्यु-२**

| | |
|---|---|
| **पोलीस स्टेशन** | नांदगाव पेठ |
| **मर्ग क्र. व कलम** | 17/2020 कलम 174 जा.फौ. |
| **फिर्यादीचे नावा व पत्ता** | मनीष नामदेवराव चर्जन वय 40 वर्षे रा. ब्राम्हणवाडा थळी |
| **मृतकाचे नाव व पत्ता** | निलेश अरविंद भोजने वय 42 वर्षे रा. सालोरा खुर्द अमरावती |
| **घटास्थळ** | मालवन होटेल जवळील मोर्शी रोड पोल्ट्रीफॅार्म जवळ |
| **घटाना ता. वेळ** | दि. 07/07/2020 चे 9.00 वा. |
| **दाखल ता. वेळ** | दि. 07/07/2020 चे 20/42 वा. |
| **मरणाचे कारण** | हृदय विकाराचा झटका लागला असवा |
| **गुह्याची थोडक्यात हकिकत** | हकिकत अशा प्रकारे आहे कि घटना ता. वेळी व ठिकाणी यातील मोटर सायकल चालक हा त्याच्या पत्नी सोबत त्याच्या वाहनाने जात असता अचानक त्याच्या वाहनासमोर एक गाय आल्याने जखमी यांना मार लागला त्याच्याच मागे माझे मोठे साळे निलेश अरविंद भोजने वय 42 वर्षे रा. सालोरा खुर्द हे मागे त्यांची मोटर सायकल क्र. माहीत नाही ह्याने अमरावती येथे आले व जवाईचा अपघात बघुन जखमी झाल्याचे पाहुन शॅाक ( धक्का ) लागल्याने हृदय विकाराचा झटका लागला असावा व ते मरण पावले अशा फि. चे जबानी रीपोर्ट वरुन व ईर्वीन मेमोवरुन सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला. |
| **तपासी अधिकारी ना०** | पोहेका सुभाष पोहणकर ब.नं. 963 |